Review Of Research
ISSN 2249-894X


Impact Factor : 3.1402(UIF)
Volume - 5 | Issue - 2 | Nov - 2015

# कनेक्ट द डॉटस्.........!

प्राध्या.श्री.ननवरे किरण वि.
सहायक प्राध्यापक, अभिनव शिक्षणशास्त्र महाविद्यालय , आंबेगाव बु., पुणे.

## सारांश

आधुनिक महाराष्टातील या रणरागिणी , हिरकण्या म्हणजे तमाम स्त्रिवर्गाच्या ‘‘आयडॉल्स’’ ठराव्यात अशा आहेत. लहान मुलांच्या पुस्तकात ठिपक्यांपासून चित्र तयार करणारा ‘कनेक्ट द डॉटस्’ हा खेळ असतो. यातल्या प्रत्येक स्त्रीने स्वतःच्या आयुष्याला आकार देतानाच इतरांच्या आयुष्याचा विचार केलाय. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीचा सामना करीत त्यांनी यशाचं चित्र तयार केलयं. अगदी रायगडच्या हिरकणी सारखं...! जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महाराष्टातीलच नव्हे तर जगातल्या अशा सर्व रणरागिणीं ज्या कालौघातही अखंडपणे मैलाचा दगड होउन स्त्रियांनाच नव्हे तर संपूर्ण मानवजातील प्रेरणा देत राहिल्या आणि राहतील अशा तमाम महिलांच्या कार्यकतृत्वाला अर्पण केलेली ही शब्दरूपी आदरांजली...... अशाच महिलांपैकी एक हिरकणी... हिरकणी बुरूज आज ही जिच्यामुळे ओळखला जातो अशा एका गवळयाच्या ,महाराष्ट्र कन्येच्या धाडसाचा मागोवा...




‘‘माझी लेकरं माझ्याकडं काहीही मागत नाहीत! फक्त दोन वेळचं जेवण मागतात. आज मी जी लेकरं सांभाळते आहे ती आहेत जनतेचीचं, मी त्यांची आई झाले , तुम्ही गणगोतं व्हा! आणि मानवतेचा हा वसा पुढे चालवा.....!’’

- सौ. सिंधूताई सपकाळ

सातारा परिसरात अठरा हजार झाडं लावून र्प्यावरण जपणा-या , तिथल्या कातकरी मुलांना शिक्षणाचे धडे देणाया.....! - संध्या चौगुले

माणदेशी बँक स्थापन करून बिझनेस स्कूलची संकल्पना अस्तित्वात आणणा-या आणि तिथं ट्र व्हॅनसारखी आधुनिक सुविधा आणणा-या......!

- चेतना सिन्हा

स्वतः निरक्षर असून जिददीने शिकून विषेश कार्यकारी अधिकारी झालेल्या आता वेल्हयातल्या स्त्रियांनां स्वयंरोजगाराचे धडे देणा-या....!

- व्दारकाबाई बालगुडे

आधुनिक महाराष्ट्रच्या या रणरागिणी , हिरकण्या म्हणजे तमाम स्त्रिवर्गाच्या ''आयडॉल्स'' ठराव्यात अशा आहेत. लहान मुलांच्या पुस्तकात ठिपक्यांपासून चित्र तयार करणारा 'कनेक्ट द डॉटस्' हा खेळ असतो. यातल्या प्रत्येक स्त्रीने स्वतःच्या आयुष्याला आकार देतानाच इतरांच्या आयुष्याचा विचार केलाय. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीचा सामना करीत त्यांनी यशाचं चित्र तयार केलयं. अगदी रायगडच्या हिरकणी सारखं.

हिरकणीच नांव समोर येतातच समारे उभं राहत ते शिवशाहीचं चित्र. आक्राळ - विक्राळ कणखर सहयाद्री, मर्द मराठे मावळे, निष्ठा, श्रध्दा यासारख्या ठिपक्यांनी तयार केलेलं .....

शिवरायांचं स्वराज्य फुलत होत. महाराष्ट्र स्वर्गीय सुखात नांदत होता. घरोघरीचे नंदादीप प्रशांत तेवत होते. अंगणातली तुळशी-वृंदावनं मंजि-यांनी डौलत होती. उखळा जात्यांचे गळे धान्यांनी भरून येत होते. दुधा-दहयाचा पूर वाहात होता. घरोघरीच्या राधिका पहाटे उठून अंघोळया करून दहया-ताकाचे डेरे घुमवित होत्या. गोठयांमध्ये गाय-वासरांची गर्दी झाली होती. गृहलक्ष्मी सोन्या मोत्यांवाचून रिती नव्हती, अशा या स्वराज्याची राजधानी रायगडाची शोभा काय वर्णावी? रायगडाचा डोलच न्यारा, दृष्टीला भोवळ यावी असे एका बाजूला ताशीव तुटलेले कडे , तर दुस-या बाजूला? थेट आभाळाला भिडलेला रायगड! मोठ-मोठे वाडे, प्रचंड महाव्दारं, उंच उंच मनोरे, मंदिरे, डौलदार हत्तींच्या अंबा-या , फुरफुरणारी घोडी, आणि... भारदस्त दरबारी माणसं. राजीयांचा रायगड म्हणजे प्रत्यक्ष रामाची आयोध्याच होती.

अशा या रायगडाच्या पायथ्याला भल्या सकाळी येसाजीनं नाईकांना हाक दिली. आणि सांगितलं की, गडावर कोजागिरी पोर्णिमेचा उत्सव आहे. त्यासाठी गवळीवाडयातून पाच हंडे दूध पाठवून द्या. गवळीवाडयाच्या नाईकानं कबूल केलं आणि त्यानं हिरा, सगुणा, राधा या गवळणींना तसा आदेश दिला. गवळणींनाही आनंद झाला त्यातल्या हिरा गवळणींनं अजून गड पण बघितला नव्हता.

सगळया गवळणी दुधाचे हंडे घेवून गडावर जाण्यासाठी तयार झाल्या. हिरानंही बाळाला दूध पाजलं आणि पाळण्यात निजवून तिही निघाली. तिला कधी एकदा रायगड बघते असं झालं होतं. आणि महाव्दारातून सा-या गवळणी रायगडावर प्रवेशल्या. तेव्हा गड गजबजून गेला होता. राजधानीचा तो थाट पाहून हिरा बावरूनच गेली. सर्वजणी राजवाडयात गेल्या, मुदपाकखान्यात दूध घातलं. दुधाचे पैसे घेतले आणि त्या राजवाडयाबाहेर पडल्या. दिवस त्यावेळी मावळतीला गेला होता. पण राजरस्यावर घोडे, हत्ती, पालख्या, मेणे यांची वर्दळ चालूच होती. बाजारपेठ तर ऐश्वर्याने झगमगत होती. डोक्यावर रिकामा हंडा घेवून हिरा रायगड पहात होती. तिच्या मैत्रिणी तिला घरी परतण्याची घाई करीत होत्या.

पण हिराचा पाय उचलतच नव्हता. अखेर तिला सोडून सगळया मैत्रीनी निघून गेल्या. आणि तरीही हिरा मात्र रायगडाचं वैभव डोळयात साठवून घेण्यात भानच विसरून गेली होती. आणि त्याचवेळी गडाचा महादरवाजा बंद झाल्याची तोफ कडाडली. दरवाजा बंद होताच हिरा घाबरूनच गेली कारण गडाखाली जायला ती एकच वाट होती. आता आपण कसं जाउ? बाळ रडत असेल, या काळजीनं ती रडू लागली आणि तिथं असणा-या शिलेदाराला रडत रडत आपली चुकामूक झाल्याच सांगू लागली. दरवाजा उघडून आपणास गडाखाली सोडण्याविषयी हात जोडून विनवू लागली. पण स्वराज्यातले नियमच इतके काटेकोर की, प्रत्यक्ष छत्रपती षिवरायांनी जरी गडाचे दरवाजे सायंकाळनंतर उघडायला

सांगितले असते तर ते उघडले नसते. याची परीक्षाही राजांनी घेतली होती. शिलेदारांनी हे सर्व हिराला सांगितलं , पण एका मातेचं मन ते ऐकत नव्हतं. शिलेदारांनी रायगड म्हणजे माहेर आहे, आणि हिराने इथ सकाळपर्यंत निःसंकोच राहवं असं सांगितलं.

मात्र हिरा मधली आई हे काहीच ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हती. वेळ जसजसा जात होता तसतशी तिच्या जीवाची  घालमेल वाढत होती. बाळ काय करीत असेल? झोपलं असेलं का? झोपलं तर एवढा वेळ कसं झोपलं? त्याला भूक लागली असेल का? एक ना दोन तिला असंख्य प्रश्न सतावित होते. शिलेदार , मावळे तर ऐकत नव्हते. आणि तिन ठरवलं..... गड उतरायचाच. पश्चिमेकडं थोडा पहारा कमी होता तिथं एखादी वाट मिळते काय ते बघण्यासाठी ति निघाली.....

एक माता निघाली. अतिशय कठिण परिस्थितीत आपल्या तान्हुल्यासाठी.....ती पश्चिमेच्या एका तुटलेल्या कडयावर येवून पोहोचली. तिनं खाली वाकून पाहिलं काळया-कभिन्न अंधारात बुडालेली भयंकर दरी होती ती. चार-पाचशे हात खोल. बाजूला किर्र जंगल. हिरानं मनाचा निश्चय केला. हंडा जमिनीवर  ठेवला. इकडं तिकडं पहात पदर कमरेला पदर खोचून ती अलगद कडा उतरू लागली. कुठतरी बारीकशा कपारीत तिच्या बोटांना एक आधार सापडला. मिळेल तेवढया आधारावर सा-या जीवचा भरवसा टाकून ती बोट-बोट, वीत-वीत अंतर कापीत खाली उतरू लागली. धुं धुं करीत वा-याची मुसंडी तिला बसत होती. जंगलाच्या फांद्यांची वा-यानं होणारी सळसळ, करकर वटवाघळांची किंचाळणी आणि फडफड तिच्या काना शेजारून जात होती. मधूनच घुबडं घुत्कार करत होती. तिच्या हातांना खाली उतरताना खरचटत होतं, गुडघ्यांना लागत होतं. काटेरी झुडूपं तिला अंधारात ओरबाडीत होती.

पण हिराच्या मनाला कशाची पुसटशीही भिती वाटत नव्हती. तिच्या काळजाध्ये आली होती सुसरीची निर्भयता, तिच्या रूपात कडयावरून एक ‘‘मुर्तीमंत माता’’ खाली उतरत होती. आईची सारी पुण्याई, आईचं सारं सामर्थ्य ,हिराच्या अंगी आलं होतं

आणि

त्याचवेळी रायडावर एकच बोभाटा झाला. गवळण हरवली.... गवळण हरवली... कुठं गेली कुणालाच समजेना महाराजांच्या कानावर सारा मजकूर गेला. त्यानी किल्लेदारांला तिचा शोध घेण्याची आज्ञा केली. सारा रायगड मग पालथा घातला गेला शंभर मावळे मशाली घेवून गडाखाली धावले गडाखालच्या जंगलामध्ये शोधा-शोध झाली पण हिरा सापडली नाही ती नाहीच.

ही बातमी गवळीवाडयाकडं द्यायला गेलेल्या मावळयांना प्रत्यक्ष हिराच समोर आली. मावळे तिच्याकडे ऑ..... करून पहातच राहिले. ही गड उतरून आलीच कशी? आणि मग मावळयांनी दौडतच जाउन गड गाठला व त्यांनी हिरा तो तुटका कडा उतरून घेरी गेल्याची बातमी सांगितली. ही बातमी ऐकताच महाराज सुध्दा आश्चर्याने थक्क झाले. महाराजांनी तिला बोलावणं धाडलं. हिरा भितभितच महाराजांना सामोरी आली. आणि सारा वृत्तांत सांगितला.

त्यावर छत्रपती शिवराय म्हणाले.... ‘‘हिराच्या धाडसानं आम्ही थक्क झालो आहोत. मुलाच्या ओढीनें आईनं केलेलं हे दिव्य पाहून आम्हाला प्रत्यक्ष आमच्या मॉंसाहेब आठवल्या. शाब्बास मुली! रायगडाची कडयाकुलपं अभेद्य आहेत असं आम्ही आजपर्यंत समजत होतो. परंतू काळ गडाच्या

महादावाजाचा पराभव करत प्रत्यक्ष यमराजाच्या पाठीवरून तू कडा उतरलीस. पंत.... या मुलीची ओटी सोन्याच्या मोहरांनी भरा! जगदंब ....जगदंब!

''मराठयांच्या मुलीच, अशी जीवावरची धाडसं करू शकतात! अशा मातांचे दूध पिणा-या मराठयांना जिंकायला खासा औरंगजेब जातीनं जरी आला तरी फत्ते होईल ती फक्त आमचीच! जगाच्या पाठीवर जोवर हा रायगड आहे तोवर या मुलीलाही जग विसरणार नाही. ही हिरा गवळण ज्या कडयावरून उतरली तिथं एक बुरूज बांधा आणि त्या बुरूजाला नाव द्या - हिरकणी बुरूज....!''.
एका अमराठी कवी/लेखकाचे शब्द असे आहेत.

''अज्ञात अंगुलीनी लिहिले शिवचरित्र
हे कार्य प्रेषितांचे मी कारणास मात्र''

कार्य वेगवेगळी, तरी उदिदष्ट मात्र एकचं...! कनेक्ट द डॉटस्...! पात्र वेगवेगळी, तरी ध्येय मात्र एकचं..! कनेक्ट द डॉटस्....! काळ वेगळा, वेळ वेगळी तरीही ...... कनेक्ट द डॉटस्....! टिंब टिंब जोडावी.... कलाकृती बनवावी... ओंजळ ओंजळ फुलं वेचावी.... त्याचा हार बनवावा... किंवा गजरा करावा.....ती फुलं भगवंताच्या नशिबी असतील किंवा कुणा एका राधिकेच्या खोप्यामध्ये विसावतील.... आपणच ठरवायच असतं.

लोकांच्या मनातले आयडॉल होण्या अगोदर आपण प्रथम स्वतःसाठी आयडॉल ठरायचं. मन खंबीर असलं, उददीष्ट प्रामाणिक असलं तर कुणाच्याही मदतीविना आपण कुठलाही गड अथवा दरी चढू शकतो आणि उतरूही शकतो. अगदी हिरा गवळणीसारखं.... म्हणजेच हिरकणी सारखं...!

## संदर्भ :


- बळवंत मोरेश्वर पुरंदरे (१९६१), माझे नाव रायगड
- गो.नी. दांडेकर, (१९७४) , श्रीक्षेत्र रायगड दर्शन.
- प्रल्हाद नरहर देशपांडे (१९८१), रायगड दर्शन
- गोपाळ चांदोरकर (२००१), रायगड एक अभ्यास: चला पाहू या रायगड.
- पराग लिमये (२००२), रायगड अभ्यासवर्ग ; जनसेवा समिती, विलेपार्ले.
- पांडुरंग पाटणकर, २००६: आजचा रायगड